**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ७१६/२०२५**

चंद्रकला वि. ज्ञानोबा

निशाणी क्रमांक **११९**

**प्रतिवादी क्रमांक ५ व ६ तर्फे साक्षीदार क्रमांक १ चंद्रकांत बाबासाहेब शिंदे यांचा शपथेवर वादी तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. एन. एस. सुर्यवंशी यांच्यामार्फत**

१. दिनांक २५.०९.१९८२ रोजी माझा जन्म झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की वादी मिळकती माझे आजोबा ज्ञानोबा यांचे वडीलोपार्जित मिळकती होत्या. ज्ञानोबा यांना एक मुलगी नामे जयश्री व मुलगा बाबासाहेब असे होते. वादी चंद्रकला ही माझे आजोबा यांची मुलगी आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे वडील त्यांचे आईवडीलांसोबत राहण्यास एकत्र होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरी किंवा आजोबाच्या घरी शासकीय नोकरदार कोणी नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सर्व दावा जमिनी जिराईत जमिनी आहेत. साक्षीदार स्वतः सांगतो की गट नंबर ३७२ पैकी निम्मी जमीन बागायती आहे.

२. हे म्हणणे खरे आहे की, खरेदी दस्त क्रमांक १५७२/१९९५ व १५७३/१९९५ च्या वेळी मी अज्ञान होतो. खरेदीदस्त क्रमांक १५७२/१९९५ माझ्या नावे व १५७३/१९९५ हा प्रतिवादी क्रमांक ६ च्या नावे नोंदविण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की पहिलयापासून आमची आर्थिक परिस्थिती गरिबीची होती. वादी चंद्रकला ही परजातीच्या पुरुषाशी लग्न केले आहे, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे वादीवर माझे वडील व आजोबा हे रोष धरुन होते. हे म्हणणे खरे नाही की वर नमुद दोन्ही खरेदीखतात नमुद मोबदल्याची रक्कम मी व प्रतिवादी क्रमांक ६ यांनी आमच्या आजोबाला दिली नव्हती. मला मराठी भाषा लिहिता व वाचता येते. खरेदीखतातील मजकुर मी वाचुन पाहिला आहे.

३. आता मला खरेदीदस्त क्रमांक १५७२/१९९५ निशाणी क्रमांक ११६ ची मुळ प्रत दाखवण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, सदर दस्तातील पान क्रमांक ३ मधील,"माझी मालकी वहिवाटीची वडीलोपार्जित जमीन" हा मजकुर खोडलेला असल्याचे दिसून येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मजकुर खोडल्यानंतर त्याच्या बाजुस

खरेदी देणाराची सही नाही. वाद जमीन खरेदी घेण्यापुवी मी व प्रतिवादी क्रमांक ६ यांनी मालकी हक्काबाबत चौकशी केलेली नव्हती.

४. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबाच्या नावे असलेल्या वडीलोपार्जित जमिनीचे माझे वडील व त्यांच्या बहिणीमध्ये अद्याप वाटणी झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी व प्रतिवादी क्रमांक ६ यांनी संगणमत करुन आमच्या आजोबाकडून पोकळ खरेदीदस्त करुन घेतलेले होते. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्रमांक ४ तर्फे साक्षीदाराचा उलटतपास नाही.**

**प्रतिवादी क्रमांक ३ व त्यांच्या विधीज्ञांचा पुकारा केला असता ते गैरहजर त्यांच्या वतीने साक्षीदारांचा उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.02.24 11:28:59 +0530

दिनांकः–२३.०२.२०२६

**अ. अ. शेख**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 23-02-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 23-02-2026 |
| Order uploaded on | - | 24-02-2026 |